Reg. No- Bom.178-KPR KF-93 Estd: 29/08/ 1963

# Vidya Prasark Mandal, Gadhinglaj.

**Tal- Gadhinglaj, Dist- Kolhapur. Pin- 416502**

**Ref . No./VPM/ 320 /2025-26** **Date : 31/07/2025**

## पवित्र पोर्टल मुलाखतीसह ४० टक्के टप्पा अनुदानित पुर्णवेळ शिक्षक नियुक्ती आदेश

संदर्भ :-

१. शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग कमांक सीईटी-२०१५/प्र.क्र. १४ टीएमटी-१ दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१९.
२. पवित्र पोर्टल मुलाखतीसह शिक्षण सेवक भरतीबाबत प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात.
३. शिफारस प्राप्त उमेदवारांची मूळ कागदपत्र पडताळणी व मुलाखत दि. १८/०७/२०२५
४. संस्था ठराव कं. २ दि. १९/०७/२०२५
५. जा.कं. उमा १/२/पवित्र/नाहरकत/२५/६१९४/ दि. २४/०७/२०२५.

वरील संदर्भिय आदेश व परिपत्रकानुसार विद्या प्रसारक मंडळ, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज. जि. कोल्हापूर **(273411SC008)** अधिनस्त पवित्र पोर्टल मुलाखतीसह ४० टक्के टप्पा अनुदानित पुर्णवेळ शिक्षक पदी नियुक्ती देणेबाबत मुलाखतीतील गुणवत्ता यादीनुसार तसेच संबंधितांनी स्वयंप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेल्या व प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणीमध्ये तपासणी कामी पडताळणी केलेल्या कागदपत्रांच्या आधारे खालील अटी व शर्तीच्या नुसार नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. कं. | उमेदवाराचे संपूर्ण नाव | पद | विषय | जात प्रवर्ग | निवडीचा प्रवर्ग (समांतर आरक्षण शिफारस) | नियुक्ती दिलेली शाळा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Mrudula Shailendra Thakur (2310007014) | Higher Secondary Teacher (partialy Aided 40% ) (S16:44900-142400) | Biology | General | Genereal (Women), Non-PH, Non-Orphan | Raosahebanna Kitturkar Jr. College, Gadhinglaj. | |

**अटी व शर्ती :-**

१. **४० टक्के टप्पा अनुदानित पुर्णवेळ शिक्षक** म्हणून नियुक्ती ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून केली आहे, त्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून दिल्यानंतरच तुम्ही शिक्षण सेवक म्हणून नियुक्तीस पात्र राहाल.
२. सदर नियुक्ती आदेश मिळालेपासून ०७ दिवसाचे आत संबंधित शाळेवर हजर होणे बंधनकारक आहे.
३. **४० टक्के टप्पा अनुदानित पुर्णवेळ शिक्षक** म्हणून वेतनश्रेणी (S16:44900-142400) ४० टक्केच्या प्रमाणात वेतन दिले जाईल.
४. **४० टक्के टप्पा अनुदानित पुर्णवेळ शिक्षक** म्हणून वर नमूद उच्च माध्यमिक शाळेत काम करावे लागेल.
५. **४० टक्के टप्पा अनुदानित पुर्णवेळ शिक्षक** नियुक्तीच्या कालावधीमध्ये आपण कोणत्याही स्वरूपाची गैरवर्तणूक केल्यास, आपली नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. त्यासाठी नियुक्ती पत्रातील कालावधी बंधनकारक राहणार नाही. त्याबाबत तुम्हास प्राधिकृत समितीकडे अपील करता येईल.
६. नियमित शिक्षकांना लागू असणारे कोणतेही लाभ/सुविधा लागू असणार नाहीत.
७. शासन सेवेत दिनांक १ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सद्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजनेऐवजी केंद्र शासनाच्या धरतीवर नवीन परिभाषेत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. त्याप्रमाणे पदस्थापना आदेश निर्गमित झालेनंतर संबंधित कार्यालय प्रमुख यांनी कार्यवाही करावी व तसे प्रतिज्ञापत्र संबंधित उमेदवाराकडून घेण्यात यावे.
८. उमेदवारास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २८ मार्च, २००५ आणि शासन परिपत्रक दिनांक १ जुलै २००५ मधील नमूद, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने रुजू होताना दिनांक २८/०३/२००५ रोजीनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या नमूद करून, हयात असलेल्या मुलांचल संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८/०३/२००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलामुळे उमेदवार शिक्षण सेवक या पदासाठी अनर्ह ठरणार आहे, असे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र उमेदवाराने सादर करणे बंधनकारक राहील.
९. नियुक्तीच्या कालावधीत नेमून दिलेलया शाळेत खालील कर्तव्ये पार पाडवी लागतील.
   - संबंधित उमेदवार यांनी नियुक्तीच्या ठिकाणी मुख्यालयी वास्तव्य करणे बंधनकारक राहील.
   - संबंधित शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेमध्ये दाखल करून घेण्याच्या तसेच विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती टिकविणे व त्यांना अपेक्षित संपादन पातळी पर्यंत नेण्याच्या दृष्टीने पालकांशी संपर्क ठेवणे.

- शाळेमध्ये दररोज संपूर्ण शालेय कालावधीमध्ये नियमित व वेळेवर उपस्थित राहणे, अभ्यासक्रमामध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते शैक्षणिक साहित्य निर्माण करणे व त्या साहित्याचा दैनंदिन अध्यापनात वापर करणे.
- नेमून दिलेल्या वर्गाचे विहित कार्यपध्दीनुसार परिणामकारकरित्या अध्यापन करणे.
- शासनाने आयोजित केलेल्या विविध प्रशिक्षणास वेळोवेळी उपस्थित राहणे.
- शाळेचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, शिक्षण विस्तार अधिकारी, प्रशासनाधिकारी, शिक्षणाधिकारी व संस्था पदाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करणे व शैक्षणिक बाबींबाबत त्यांच्या आदेशाचे पालन करणे.
- वर्गातील विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण व सर्वकष मूल्यमापन करणे, शैक्षणिक व इतर उपक्रमांच्या (अभ्यासपूरक व सहशालेय इ.) आयोजननामध्ये सहभागी होणे.

१०. पदस्थापना आदेश निर्गमित झालेनंतर जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून एक महिन्याच्या आत वैद्यकीय तपासणी करून यावी लागेल. जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून शारीरिक व मानसिकदृष्टया पात्र असल्याचे प्रमाणित झालेनंतर आपली शिक्षण सेवक पदासाठी नियुक्ती ग्राहय धरण्यात येईल.

११. जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून वैद्यकीय तपासणी अंती पात्रतेच्या प्रमाणपत्राच्या अधिन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

१२. सदर आदेशाचे तुमची शिक्षण सेवक म्हणून दिलेली नियुक्ती बाबत कोणी आक्षेप घेतल्यास व प्राथमिक चौकशी अंती त्यात तथ्य दिसून आल्यास तसेच पवित्र पोर्टल मध्ये स्वप्रमाणपत्रामध्ये नमूद केलेली माहिती व तुम्ही सादर केलेल कागदपत्रे याबाबत भविष्यात कोणतीही तफावत आढळून आल्यास तुमची नियुक्ती कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल.

१३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग कं. व्हिसीए/२०१३/१४११/प्र.क.५१/१६अ दि. ०१/०३/१९९४ मधील निर्देशानुसार उमेदवाराचे चारित्र व पुर्वचारित्र पोलीस तपासामध्ये चांगली असल्याचे अटीस अधिन राहून आपणास नियुक्ती देण्यात येत आहे. त्याप्रमाणे उमेदवारोन चारित्र व पूर्वचारित्र पडताळणी करून प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. चारित्र पडताळणीमध्ये कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून आलेस आपली नियुक्ती रद्द करणेत येईल.

१४. आपले डी.एड/बी.एड चे गुणपत्रक व प्रमाणपत्र, टीईटी प्रमाणपत्र यांची पडताळणी करून ते वैध असल्याबाबतचे प्रमाणपत्र दिल्यानंतरच आपली नियुक्ती पुढे चालू राहील. अन्यथा आपली सेवा समाप्त करण्यात येईल.

१५. शासन निर्णय कं. मभाष/१०८७/१४/सोमार-०२/८७/२० दि. ३० डिसेंबर, १९८७ नुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदर उत्तीर्ण झाला नसेल तर हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण व्हावी अन्यथा नियमानुसार कार्यवाही करणेत येईल.

१६. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण - २०००/प्र.क्र. ६९/२००९/३९ दिनांक ११ मार्च, २००३ नुसार संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत प्राप्त करणे आवश्यक राहील, मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास आपली नियुक्ती आपोआप रद्द समजण्यात येईल.

१७. उमेदवारास आपल्या सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास एक महिना पूर्व नोटीस द्यावी लागेल अथवा एक महिन्याचे मूळ वेतन शासन खाती जमा करावे लागेल.

१८. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६ व १२/१२/२०१७ अन्वये ज्या उमेदवारांची निवड मागास प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झाली व ज्यांची जाती दाव्यांची पडताळणी झालेली नाही अशा उमेदवारास त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून प्राप्त करून घेणे आवश्यक राहील. नियुक्ती स्वीकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधित जात पडताळणी समितीकडे सादर करावा लागेल व जातपडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीचे साक्षांकित प्रत सादर करावी लागेल. जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येईल. अश उमेदवारांविरूध्द महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र क्र. २१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५ ऑगस्ट २०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्य न्यायालय दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यात आली आहे. यावर मा. सर्वोच्य न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश देण्यात येत आहे.

१९. उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी हजर होताना कार्यालय प्रमुखास स्वत:ची ओळख पटवून हजर होणेचे आहे. तसेच उमेदवार हजर होताच त्यांचेकडून भारत सरकार व भारताची राज्य घटना या विषयी एकनिष्ठ राहिन अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र ठराविक नमुन्यात भरून घेवून ते त्यांचे सेवापुस्तकामध्ये समाविष्ठ करावे.

२०. उमेदवाराने दिलेल्या नियुक्तीच्या ठिकाणी हजर होणे बंधनकारक राहील, नियुक्तीच्या ठिकाणात कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही. बदल करण्यासाठी प्रयत्न केल्यास किंवा राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास आपली नियुक्ती रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कळावे,

सचिव
विद्या प्रसारक मंडळ
गडहिंग्लज

प्रत :-

१. कु. मृदुला शैलेंद्र ठाकूर, मु.पो.- इ वॉर्ड शकुंतला कॉम्पलेक्स, राजारामपुरी, ४थी गल्ली. ता. करवीर, जि. कोल्हापूर. ४१६००८
२. मा. शिक्षण उपसंचालकसो, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.
३. मा. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, कोल्हापूर.
४. प्र. मुख्याध्यापिका, जागृती प्राथमिक विद्यामंदिर, गडहिंग्लज. ता. गडहिंग्लज. जि. कोल्हापूर.